लोकमत

# विशेष कारागृहात बंद्यांच्या पुनर्वसनासाठी 'प्लम्बिंग कोर्स'

लोकमत न्यूज नेटवर्क



रत्नागिरीतील विशेष कारागृहात बंद्यांसाठी प्लम्बिंगचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. सोमवारी या प्रशिक्षणाचा प्रारंभ विशेष कारागृहाचे अधीक्षक सचिन पाटील, जनशिक्षण संस्थानच्या निधी सावंत, फिनोलेक्सचे श्रीदत्त अलबुर, आटीआयचे नाटेकर आदींच्या उपस्थितीत झाला.

**सुटकेनंतर सन्मानाने जगण्यासाठी कारागृह प्रशासन, मुकुल माधव फाउंडेशन, जनशिक्षण संस्थान आणि आयटीआयचा संयुक्त उपक्रम**

**रत्नागिरी :** गुन्हेगारीच्या गर्तेतून बाहेर पडून कारागृहातील बंदी बांधवांनी मुख्य प्रवाहात यावे आणि शिक्षेनंतर समाजात स्वतःच्या पायावर उभे राहून सन्मानाने जगावे, यासाठी रत्नागिरी विशेष कारागृहाने एक कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. कारागृहातील बंदिस्त बंदी बांधवांसाठी 'कौशल्य विकास कार्यक्रमां'तर्गत सोमवारी (दि. १५) विशेष 'प्लंबिंग कोर्स' प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

मुकुल माधव फाउंडेशन (पुणे), जनशिक्षण संस्थान (रत्नागिरी) आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय, रत्नागिरी) यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कारागृहातून मुक्त झाल्यानंतर बंद्यांचा सर्वांगीण विकास व्हावा आणि त्यांना उजळ माथ्याने समाजात रोजगार किंवा व्यवसाय करता यावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश आहे. प्लंबिंग क्षेत्रात सध्या मोठ्या प्रमाणावर कुशल कारागिरांची गरज असून, या तांत्रिक प्रशिक्षणामुळे बंद्यांच्या हाताला हक्काचा रोजगार मिळण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्र कारागृह विभागाचे अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके आणि विशेष कारागृह महानिरीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे.

या उद्घाटनप्रसंगी फिनोलेक्सचे (रत्नागिरी) प्रेसिडेंट ऑपरेशन श्रीदत्त अलबुर, प्लांट एचआर हेड नंदकिशोर शिंपी, फॅक्टरी मॅनेजर सागर चिवटे, सिनिअर ऑफिसर आशिष आठवले, सीएसआर प्रतिनिधी श्यामराव निंबाळकर, वरद गोरे, जनशिक्षण संस्थानच्या संचालिका निधी सावंत आणि आयटीआय रत्नागिरीचे नाटेकर आदी उपस्थित होते. या सर्व मान्यवरांनी उपस्थित बंदी बांधवांना कौशल्य आत्मसात करून जीवनाची नवी सुरुवात करण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेनंतर रत्नागिरी विशेष कारागृहाचे अधीक्षक सचिन पाटील यांनी उपस्थित सर्व संस्थांचे आणि मान्यवरांचे आभार मानले. कारागृहातील वातावरण सुधारात्मक बनवण्यासाठी आणि बंद्यांच्या पुनर्वसनासाठी अशा स्वरूपाचे उपक्रम मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके नियोजन कारागृह अधिकारी अनिकेत गोरवाडकर (तु.अ. श्रेणी-२) यांच्यासह कारागृह कर्मचारी किशोरसिंग परदेशी, हणमंत माने, गणेश चोपडे आणि समद सय्यद यांनी केले. या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे रत्नागिरी शहरात आणि सामाजिक स्तरातून कौतुक होत आहे.